# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.10.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज होणार पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता मोहिमेचा प्रारंभ.
2. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी भारत आणि अफगाणिस्ताननं एकत्र येण्याची गरज असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन
3. फ्रान्सचे पंतप्रधान म्हणून सबास्टिअन लेकोर्नू यांची पुनर्नियुक्ती
4. येत्या एक नोव्हेंबपासून चीनवर अतिरिक्त 100 टक्के आयात कर लादण्याचा अमेरिकेचा निर्णय आणि
5. वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची दमदार सुरुवात

**<u>पंतप्रधान धनधान्य</u>**

पंतप्रधानांच्या हस्ते आज दिल्लीत एका विशेष कार्यक्रमात 42 हजार कोटी रुपयांच्या कृषी आणि कृषीसंबंधित विविध प्रकल्प आणि योजनांचं उद्घाटन होणार आहे. पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळींमध्ये आत्मनिर्भरता मोहिमेचा यात प्रमुख्यानं समावेश आहे. यावेळी पंतप्रधान शेतकऱ्यांशी संवादही साधणार आहेत. या योजनांमधून शेतकरी कल्याण, कृषी क्षेत्रात आत्मनिर्भरता आणि ग्रामीण संरचना भक्कम करण्याबाबत सरकारची कटिबद्धता अधोरेखित होणार आहे. प्रधानमंत्री कृषी धनधान्य योजनेला 24 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, पिकांची उत्पादकता वाढवणं, पीक उत्पादनाची शाश्वतता निश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं देशातल्या 100 जिल्ह्यांची निवड केंद्र सरकारनं यासाठी केली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झाली आहे. देशात विविध ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमांत शेतकरी दूरस्थ पद्धतीनं सहभागी होणार आहेत. पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात प्रयोगशील आणि प्रगतिशील कामगिरी करणारे 300 हून अधिक शेतकरी सहभागी होणार आहेत.

**<u>राजनाथ</u>**

भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यान औद्योगिक भागीदारी आणि क्षमता विकासाला चालना देण्यासाठी सिडनी इथं काल पहिली भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण उद्योग व्यवसाय गोलमेज परिषद पार पडली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ऑस्ट्रेलियाचे संरक्षण उपमंत्री पीटर खलील यांनी या परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवलं. दोन्ही देशांतील आघाडीचे उद्योग प्रतिनिधी परिषदेला उपस्थित होते. भारत-ऑस्ट्रेलिया व्यापक धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी संयुक्त प्रकल्प आणि गुंतवणुकीबाबत त्यांनी उत्सुकता दाखवली. दोन्ही मंत्र्यांनी सिडनीमधील एचएमएएस कूत्तबुल या धोरणात्मक नौदल परिसरालाही भेट दिली.

**<u>जयशंकर</u>**

भारत आणि अफगाणिस्तान यांनी दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी एकत्र येण्याची गरज परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी व्यक्त केली. दिल्लीत काल अफगाणिस्ताचे परराष्ट्र मंत्री मावलावी अमिर खान मत्ताकी आणि जयशंकर यांच्या दरम्यान झालेल्या बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात ही माहिती दिली आहे.

विकास आणि समृद्धीसाठी उभय देशांनी सामाईक वचनबद्धता व्यक्त केल्याचं डॉक्टर जयशंकर म्हणाले. भारताला अफगाणिस्तानचा विकास आणि प्रगतीमध्ये रस असल्याचं सांगून, त्यांच्या सार्वभौमत्व, अखंडत्व आणि स्वातंत्र्य यांसाठी कटिबद्ध असल्याचंही ते म्हणाले. दहशतवादी कारवायांसाठी अफगणिस्तानची भूमी वापरू देणार माही असं अफगाणिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. अफगाणिस्तानने भारताविरुद्ध विधाने केली नाहीत, आम्हाला भारताविषयी आदर असल्याचं ते म्हणाले.

**<u>फ्रान्स पंतप्रधान</u>**

फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी सबास्टिअन लेकोर्नू यांना पुन्हा एकदा पंतप्रधान म्हणून नियुक्त केलं आहे. लेकार्नू यांनी काहीच दिवसांपुर्वी पदाचा राजीनामा दिला होता. देशातली राजकीय कोंडी सोडवण्यासाठी सरकारची पुनर्स्थापना करण्यासाठी आणि अर्थसंकल्प सादर करण्यासाठी पुन्हा प्रयत्न करण्यास सांगितलं आहे.

**<u>अमेरिका निर्यात शुल्क</u>**

अमेरिकेने येत्या एक नोव्हेंबपासून चीनवर अतिरिक्त 100 टक्के आयात कर लादण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अतिरिक्त कराबरोबरच, अतिमहत्त्वाच्या सॉफ्टवेअरवर देखील अमेरिकेचे प्रशासन स्वतःचे निर्यात नियंत्रण लादणार असल्याचं समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. चीनने मौल्यवान दुर्मिळ खनिजांवर नव्याने निर्यात नियंत्रण लादण्याचा निर्णय घेतला आहे, त्याला प्रत्युतर म्हणून अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चीनकडून आयात होणाऱ्या मालावर 130 टक्के कर लागू होईल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी चीनने निर्यात नियंत्रण रद्द केल्यास हा कर मागे घेतला जाऊ शकतो असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<u>इस्रायल युद्धबंदी</u>**

इस्रायल आणि हमास यांच्यातल्या युद्धबंदी करारानंतर गाझाच्या काही भागांतून सैन्य अंशतः मागे घेतल्याचं इस्रायल लष्कराचं म्हटलं आहे. तरीही अजूनही गाझापट्टीचा अर्धा भाग लष्कराने व्यापला आहे. पुढच्या टप्प्यांची चर्चा पुढे सुरू आहे. इस्रायलच्या संरक्षण दलांनी जारी केलेल्या निवेदनात सैन्य माघारी घेण्यास सुरुवात झाली असून, मात्र अद्याप त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भागात प्रवेश करणे टाळण्याचे आवाहन स्थानिकांना करण्यात आलं आहे.

**<u>बिहार जागावाटप</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर विविध पक्षांचा जागावाटपाचा प्रश्न काल दिवसभराच्या चर्चा, बैठकांनंतर सुटल्याचे चित्र आहे. पाटणापासून दिल्लीपर्यंत काल दिवसभर बैठकांची मालिका सुरू होती. यामध्ये भाजप नेत्यांनी, जनता दल युनायटेड, राष्ट्रीय लोक मोर्चा, हिंदुस्तानी आणि लोकजनशक्ती पक्ष रामविलास यांच्याशी चर्चेच्या फेऱ्या केल्या. त्याचवेळी राजद, काँग्रेस आणि भाकप - यांनी त्यांच्या भविष्यातील रणनीतीवर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठका घेतल्या. राजदच्या संसदीय मंडळाने बैठक घेतली आणि लालू प्रसाद यांना सर्व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यांसाठी उमेदवारांची नावे अंतिम करण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी भाजपच्या कोअर कमिटीची आज दिल्लीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे.

**<u>अमित शहा</u>**

मतदार यादीच्या सखोल पडताळणी प्रक्रियेत कोणीही हस्तक्षेप करू नये, कारण ती निवडणूक आयोगाची संवैधानिक जबाबदारी आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्ली इथं एका खाजगी पुरस्कार समारंभाला संबोधित करताना केलं. घुसखोरांना शोधून हद्दपार करण्याच्या धोरणाचं सरकार काटेकोरपणे पालन करेल, तसंच मतदानाचा अधिकार केवळ भारतीय नागरिकांनाच असला पाहिजे असं ते म्हणाले.

**विमान भाडं**

सणासुदीच्या काळात विमान कंपन्यांनी किफायतशीर विमान भाडं ठेवावं असं आवाहन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी केलं आहे. नवी दिल्लीत काल झालेल्या एका बैठकीत ते बोलत होते. सणासुदीच्या काळातील अतिरिक्त मागणी लक्षात घेऊन अतिरिक्त उड्डाण नियोजित कळे असून प्रवाशांच्या सोयीला सर्वोच्च प्राधान्य राहील असे आश्वासन विमान कंपन्यांनी दिले आहे.

**नीती आयोग**

नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी काल कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थव्यवस्थेतील रोजगार निर्मितीसाठी पथदर्शी आराखडा प्रसिद्ध केला. या अहवालात, येत्या सहा वर्षांत नोकऱ्यांमध्ये बदल होणार आहेत, असा इशारा देतानाच, नव्या संधीही निर्माण होत असल्याचं सांगण्यात आलं आहे.

**बुद्ध-रशिया**

भगवान बुद्धाचे पवित्र अवशेष भारतातून रशियाच्या काल्मिकियामध्ये प्रदर्शित केले जाणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयानं स्थानिक बौद्ध भाविकांसाठी आजपासून 18 तारखेपर्यंत राजधानी एलिस्टा इथं हे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असल्याचं म्हटलं आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या नेतृत्वाखाली 11 वरिष्ठ भारतीय भिक्षूंचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ या पवित्र अवशेषांसोबत जाणार आहे.

**बॅडमिंटन**

गुवाहाटी इथं झालेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ मिश्र संघांच्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या संघानं मिश्र सांघिक स्पर्धेत कास्यपदक मिळवलं. इव्हेंट प्रकारात संघानं ऐतिहासिक पदक मिळवले आहे.

**क्रिकेट**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची सुरुवात दमदार झाली. कालच्या पहिल्या दिवसाचा खेळ काल संपला तेव्हा भारताच्या पहिला डावात 2 बाद 318 धावां झाल्या होत्या. यशस्वी जयस्वाल 173 आणि कर्णधार शुभमन गिल 20 धावांवर खेळत होते. साई सुदर्शनने 87 तर के एल राहुलने 38 धावा केल्या. साई सुदर्शन आणि यशस्वी जयस्वाल यांची 193 धावांची भागीदारी हे भारतीय डावाचं वैशिष्ट्यठरलं.

**हवामान**

दक्षिण कर्नाटक, तामिळनाडू, पुदुचरी आणि कराईकल इथं आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर केरळ, आंध्र प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुराच्या काही भागात उद्यापर्यंत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. दरम्यान महाराष्ट्रात मान्सूनचा परतीचा प्रवास कालपासून सुरू झाला. राज्यात मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला इथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.